लोकमत

# बाळाच्या व्यंगावर गर्भातच शस्त्रक्रिया

## लीलावती रुग्णालय पोलंडच्या डॉक्टरांची मदत घेणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** वैद्यकीय विश्वात वेगाने प्रगती होत असताना पश्चिमात्य देशातील वैद्यकीय ज्ञानाचा फायदा आता भारतातील रुग्णांना होणार आहे. बाळ जन्मजात व्यंग असल्याचे दिसल्यास त्याचवेळी त्या व्यंगावर शस्त्रक्रिया करून उपचार देण्याचे काम येत्या काळात राज्यात प्रथमच वांद्रे येथील लीलावती रुग्णालयात सुरू करण्यात येणार आहे. सुरुवातीच्या काळात या शस्त्रक्रिया करण्याकरिता पोलंड देशातील तज्ज्ञ डॉक्टरांची मदत घेण्यात येणार आहे.

देशात दरवर्षी ४०,००० बालके स्पायना बिफिडा या जन्मजात आजाराने जन्माला येत असतात. जन्माला आल्यानंतर या बाळांवर उपचार करण्यासाठी किमान चार शस्त्रक्रिया कराव्या लागतात. त्यामुळे या आजारातील अधिकच गुंतागुंत वाढत जाते. या गोष्टी टाळण्यासाठी जर बाळ जेव्हा आईच्या पोटातच असते त्यावेळी ही शस्त्रक्रिया केल्याने बाळाला फार मोठ्या शस्त्रक्रियांची गरज भासत नाही. प्रत्येक गर्भवती मातेला स्त्रीरोग प्रसूती तज्ज्ञ १४ ते १८ आठवड्यात ॲनोमली स्कॅन (बाळाला काही व्यंग आहे का हे पाहण्यासाठी) सोनोग्राफी सुचविली जाते.





जर काही व्यंग असेल तर त्या गर्भावर २६ आठवड्यांपर्यंत शस्त्रक्रिया केली जाते. बाळाचे जन्मजात दोष आणि गर्भाच्या समस्यांवर तीन दिवसीय विशेष वैद्यकीय परिषदेचे आयोजन २२ ते २४ मार्च रोजी करण्यात आले आहे.

### आजार काय?

आजारात बाळाच्या डोक्यात पाणी जमा होते. त्यामुळे मेंदूची वाढ होत नाही. पाठीच्या कण्याचा विकास न झाल्याने बाळाला आरोग्याच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागते. मूत्रसंस्थेत दोष निर्माण होतो.

फॉलिक ॲसिडच्या कमतरतेमुळे हा आजार होतो. त्यामुळे आईने गर्भधारणेपूर्वी ही औषधे घेणे गरजेचे आहे. सध्याच्या घडीला अशा पद्धतीच्या शस्त्रक्रिया भारतात कुठेही केल्या जात नाही. येत्या काही महिन्यात या शस्त्रक्रिया आम्ही लीलावती रुग्णालयात सुरू करणार आहोत. त्याकरिता सुरुवातीला पोलंडच्या डॉक्टरांची मदत घेणार आहोत.

- **डॉ. संतोष करमरकर**, बाल शल्यचिकित्सक, लीलावती रुग्णालय

**पोलंडमधील गायनॅक सर्जन डॉ. एग्निएस्का पास्तुस्का व्याख्यान देणार आहे. दरम्यान पत्रकार परिषदेला मेयर वायटाबायोटिक्स कंपनीचे संचालक रोहित शेलटकर उपस्थित होते.**

### कशी असते शस्त्रक्रिया?

- या शस्त्रक्रियेचा कालावधी ४० मिनिटे ते दोन तासांपर्यंत असू शकतो. यामध्ये आईच्या पोटातील गर्भाला ज्या ठिकाणी आजार झाला आहे, त्या ठिकाणी सोनोग्राफीच्या साहाय्याने पोटावर लहानसा छेद घेऊन शस्त्रक्रिया करून पुन्हा त्या बाळाला आईच्या गर्भातच ठेवले जाते.
- **विशेष म्हणजे आईला आणि त्या गर्भाला दोघांनाही भूल दिली जाते.**
- शस्त्रक्रियेनंतर ८ ते १० तासांची गर्भाची कोणती हालचाल होत नाही. मॉनिटरद्वारे बारकाईने लक्ष ठेवतात.

बाळाचा जन्म झाल्यानंतर या आजारावर उपचार देण्यापेक्षा जर आईच्या पोटात या आजाराचे निदान झाल्यावर त्याचवेळी उपचार केल्यास ८० ते ८५ टक्के सदृढ बाळ जन्माला येते. - **डॉ. एग्निएस्का पास्तुस्का**, गायनॅक सर्जन, पोलंड